# थेट मुलाखत

**वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील तदर्थ (कंत्राटी) पध्दतीने वैद्यकीय अधिकारी पदभरती**
**जिल्हा निवड समिती, परभणी**

परभणी जिल्हा परिषद अंतर्गत शासकीय आरोग्य संस्थांमध्ये रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ रिक्त पदे निव्वळ तदर्थ (कंत्राटी) पध्दतीने व तात्पुरत्या स्वरुपात नियमित वैद्यकीय अधिकारी अथवा बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी उपस्थित होईपर्यंत 11 महिन्याच्या कालावधी करिता भरावयाची आहेत.

1. शैक्षणिक पात्रता : एम.बी.बी.एस., पी.जी.पदवी / पदविका किंवा एम.बी.बी.एस. किंवा बी.ए.एम.एस. व त्यावरील शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील. संबंधित उमेदवाराचे वय हे 58 वर्षापेक्षा जास्त नसावे. (MBBS+PG) तसेच MBBS उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल, ते उपलब्ध नसल्यास BAMS उमेदवारांचा विचार करण्यात येईल) (निवड अंतिम वर्षाचे गुणांनुसार राहील)

2. शैक्षणिक कागदपत्र : सर्व वर्षाचे गुणपत्रक
पदवी / पदविका प्रमाणपत्र, 10 वी सनद, महा. वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी केलेले वैधता प्रमाणपत्र, आंतरवासियता पुर्णत्व प्रमाणपत्र, 2 पासपोर्ट साईजचे फोटो, सर्व मुळ कागदपत्रे व एकप्रत स्वसाक्षांकन प्रत.

3. मुलाखतीचे ठिकाण व वेळ : **जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी दि.** 17/04/2025 **रोजी वेळ सकाळी** 10.30 **वाजता**

4. एकत्रित मानधन दरमहा :
   * एम.बी.बी.एस. पदवी + पदविका अर्हता धारक उमेदवारास : रु. 85000/- प्रतिमाह
   * एम.बी.बी.एस. अर्हता धारक उमेदवारास : रु. 75000/- प्रतिमाह
   * बी.ए.एम.एस. अर्हता धारक उमेदवारास : रु. 40000/- प्रतिमाह

5. सदर निवड प्रक्रियेमध्ये रिक्त पदे ऐनवेळी कमी व जास्त करण्याचे तसेच निवड प्रक्रिया पुर्णपणे रदद करण्याचे अधिकार हे निवड समितीचे राहतील.

6. गुणवत्तेनुसार प्रतिक्षा यादी ही पुढील एक वर्षाकरिता ग्राहय धरण्यात येईल.

7. यापुर्वि जर काही उमेदवारांनी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयामध्ये अर्ज सादर केलेले असल्यास सदर अर्ज गृहित धरले जाणार नाहीत. जे उमेदवार थेट मुलाखतीचे दिवशी हजर राहतील त्यांचाच नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

8. सदर जाहिरात www.parbhani.nic.in / zpparbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मुलाखतीस अर्ज करण्यासाठी अर्ज नमुना मुलाखतीचे दिवशी देण्यात येईल. अर्ज स्वीकारण्याची अंतिम वेळ दुपारी 12.00 वाजेपर्यंत राहील.

स्वाक्षरीत/-
**सदस्य सचिव**
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

स्वाक्षरीत/-
**अध्यक्ष**
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी जिल्हा परभणी